# भुत दया

प्रकाशित:

१. दैनिक सकाळ मुक्तपीठ
२. सामान्यातले असामान्य पुस्तक

**रत्नाकर वाणी**

पुनरारंभ

© पुनरारंभ

**website:** http://www.rajratna.co.in **Email:** ratnakar.wani@rajratna.co.in

# भुत दया

साधारणपणे ४थी ५वी मध्ये मराठी बालभारती पुस्तकामध्ये भुतदया धडयामध्ये मुक्या प्राण्यावर, प्राणी मात्रांवर दया करा, प्रेम करा ही शिकवण मिळाली. आज वयाची साठी गाठली. ती शिकवण आजहौ आठवते. हे सर्व आठवण्याचे कारण नुकताच घडलेला प्रसंग. मला कुत्रा हा प्राणी आवडत नाही व त्याच्यावर प्रेम पण नाही. पण न जाणे वेळोवेळी का व कसे जडले.

परवाचीच गोष्ट संध्याकाळी माझा मुलगा निलेश व सुन प्रमिला ऑफिस मधून घरी परतले तेव्हा अंधार पडला होता. थंडीचा कडाका वाढला होता. त्यांच्या मागे एक लहानसे काळया रंगाचे गोंडस कुत्र्याचे पिलू आले. कितीही हाकलले तरी ते पिच्छा सोडण्यास तयार नव्हते. गेट लावले तर गेटच्या फटीतून प्रवेश करित मजकडे विजयी मुद्रेने पहात राहिले. पिलू जिंकले मी हरलो. मला त्याची दया आली. पार्कींगमध्ये गाडीच्या खाली बारदान टाकून त्याची सोय केली. त्याला दुध पोळीचा काला करून खाण्यास दिला. खाणे झाल्यावर थोडा वेळ शांत राहिले पण जसजशी थंडी वाढू लागली तस तसे त्याचे क्यॉव क्यॉव चे ओरडणे सुरू झाले. त्याच्या ओरडण्याने झोपमोड झाली. उठून परत त्याचे अंगावर दुसरे बारदान टाकले व झोपलो. सकाळी उठून पाहतो तर काय पिलू केव्हा जागा सोडून कोठे गेले याचा पत्ताच लागला नाही. आसपास शोध केला पण अयशस्वी ठरलो. मोठया कुत्र्याने तर त्याला मारले नसेल ना या विचारांनी मन बेचैन झाले. शेवटी तो आपला फक्त एक दिवसाचा पाहुणा होता अशी मनाची समजूत घातली. जाता जाता माझ्या गत स्मृतीना उजाळा देउन गेला.

वडिलांनी एक कुत्रा पाळला होता. काळया रंगाचा. मानेवर, कपाळावर, तसेच पुढच्या पंजावर पांढरे पट्टे. कपाळावरील पांढरा रंग जणू गंधच लावले होते. त्यामुळे तो देखणा व उमदा दिसत असे. त्याचे आम्ही “टॉमी” असे नामकरण केले होते. त्याचे भुंकणे, मागे लागणे मला अजिबात आवडत नसे. यामुळे मला घरातील लोकांचा रोष पत्करावा लागला. तो माणसाच्या प्रेमाचा वेडा होता. मी दिसताच धावत येउन अंगाला बिलगणे, उडया मारणे अशा लडिवाळ चाळयांमुळे न कळत माझा, एवढा प्रिय झाला की, त्याचे विणा करमत नसे. त्याच्या प्रेमळ स्वभावामुळे घरी येर्णाया प्रत्येकाच्या मागे लागत असे. मागे आला म्हणून लोक घाबरून पळत. त्याची तक्रार करू लागले. उपाय म्हणून त्याला बांधून ठेवावे लागले. सतत बांधल्यामुळे त्याचे पुढचे पाय फेगडे (वाकडे) झाले,

खाणेपिणे कमि झाले. डॉक्टरी उपाय करून पाहिले. पण व्यर्थ. जाता जाता श्वानास पण मन असते, भावना असतात दाखवून गेला.

१९९८ साली माझी विदेश संचार निगम लि. दिघी पुणे येथे बदली झाली. तेथे कॉलनीत आम्ही ज्या क्वार्टरमध्ये रहात असू त्यामध्ये आमचे आधी बंगाली कुटुंब राहत असे. त्यांनी कुत्रा पाळला होता.

संपूर्ण काळा, सदैव उंचावलेले कान, पाणीदार डोळे यामुळे तो फारच रूबाबदार व उमदा दिसत असे. त्याला “ब्लॅकी” नावाने संबोधत. त्यांची कलकत्त्याला बदली झाल्यावर ब्लॅकीस तेथेच सोडून गेले. आम्ही राहण्यास गेल्यावर ब्लॅकी आमचेकडे राहू लागला. सुरवातीला मी त्याला हाकलण्याचा प्रयत्न केला पण काही केल्या तो क्वार्टर सोडण्यास तयार नव्हता. माझी भुतदया जागृत झाली. आम्ही त्यास खाण्या पिण्यास घालू लागलो. न कळत तो आमच्या मध्ये इतका रूळला की जणू आमचे घरातील एक सदस्यच बनला. संध्याकाळी तो आमचे बरोबर फिरावयास येत असे. संध्याकाळी ७.३0 ही त्याची जेवणाची वेळ होती. वेळ झाली की, तो आमचे पायात पाय येउन चालू लागे व भुक लागल्याचे दर्शवित असे. फिरणे अर्धे सोडून त्याला खाण्यास दिले की तो शांत होई.

एकदा अचानक आम्हास गावी जाण्याचा प्रसंग पडला. जातांना दारे खिडक्या बंद केली. पुढच्या दाराला कुलुप लावले. परंतु चुकुन मागील दरवाजा बंद करणे राहून गेले. आम्ही गेल्यावर आमचे शेर्जायांच्या लक्षात आले. त्यांनी फोन करून आम्हास कळविले. आम्ही परत येईपर्यंत दोन दिवस ब्लॅकी दारातच बसून राहिल्याचे आम्हास सांगण्यात आले.

२00४ मध्ये रिटायरमेंट झाल्या नंतर जेव्हां जेव्हां मी कॉलनीत गेलो तेव्हां तो जुनी ओळख कायम ठेवत येउन पायाशी घोटाळत असे. मी पण जातांना त्याचे साठी बिस्किट जरूर घेउन जायचो. त्याचे देहावसान झाल्याचे ऐकून तर डोळयात पाणीच आले.

असा हा प्रामाणिक व इमानदार प्राणी त्याचे बद्दल भुतदया जागृत होणे स्वाभाविकच आहे.